महासंचालक (संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा), नाशिक अंतर्गत वैज्ञानिक संशोधन अधिकारी, अनिवार्य चाचणी विभाग, नाशिक हा नवीन विभाग स्थापन करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक : आढावा-२०२४/प्र.क्र.१६/आ( पुर्नरचना )

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक : ३० एप्रिल, २०२५.

वाचा :- १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. १०९२/सीआर/८०६/व्यय-६, दि.१५.१०.१९९२.

२) जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक : आढावा-१००२/(३३५/२००२)/आ(प्रशि), दि. ०६.०२.२००३.

३) जलसंपदा विभाग, शासन शुद्धीपत्रक, क्रमांक गुनिमं-२०१४/प्र.क्र.५७/निवसं-२, दि.१६.०७.२०२४.

४) महासंचालक, मेरी, नाशिक यांचे पत्र क्र.मसं/संप्रजसंसु/मअसंसं/आ-०७/७५/सन २०२४, दि.१९.०७.२०२४.

**प्रस्तावना :-**

जलसंपदा विभागांतर्गत महासंचालक, (संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा), नाशिक, अंतर्गत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत संदर्भ क्र.२ येथिल शासन निर्णयानुसार वैज्ञानिक संशोधन अधिकारी संवर्गात ३ पदे मंजूर असून यापैकी २ पदे वैज्ञानिक संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभाग व वैज्ञानिक संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभाग येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. उर्वरित वैज्ञानिक संशोधन अधिकारी पदाला सोपविण्यात आलेले राज्य विशेष कृती आराखडा (SSAP) संबंधी कामकाज संपुष्टात आल्याने तसेच संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये, अनिवार्य विशेष चाचण्या मेरीमार्फत करणे बंधनकारक करण्यात आल्याने अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत वैज्ञानिक संशोधन अधिकारी, अनिवार्य चाचणी विभाग हा नवीन विभाग स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

Scanned with OKEN Scanner

**शासन निर्णय :-**

जलसंपदा विभागातर्गत महासंचालक (संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा), नाशिक, अंतर्गत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत कार्यान्वित असलेल्या वैज्ञानिक संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभाग व वैज्ञानिक संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभाग या दोन विभागांकडील कामे विभागून तसेच बांधकाम साहित्याशी निगडीत अनिवार्य विशेष चाचण्या मेरीमार्फत करणे बंधनकारक करण्यात आल्याने याकरिता वैज्ञानिक संशोधन अधिकारी, अनिवार्य चाचणी विभाग हा नवीन विभाग स्थापन करण्यात येत असून वित्त विभाग, शासन निर्णय दि.१५.१०.१९९२ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार सध्या कार्यान्वित असलेल्या वैज्ञानिक संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभाग व वैज्ञानिक संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभाग या दोन विभागांकडील **परिशिष्ट "अ"** येथे दर्शविण्यात आलेली पदे नवीन अनिवार्य चाचणी विभागास वर्ग करण्यात येत आहेत. नवीन अनिवार्य चाचणी विभागास उपलब्ध केलेल्या पदांचा तपशील सोबतच्या **परिशिष्ट "अ"** प्रमाणे तसेच अन्य मृद चाचणी विभाग व सामुग्री चाचणी विभाग या दोन विभागांच्या पदांचा तपशील **परिशिष्ट "ब** प्रमाणे राहील.

२. नवीन अनिवार्य चाचणी विभाग (एकूण ९ पदे) कार्यान्वित करण्याची कार्यवाही महासंचालक, मेरी, नाशिक यांनी कोणताही अतिरिक्त व अनावश्यक खर्च न करता करावी. नवीन विभागाकरिता उपलब्ध करुन दिलेली पदे संबंधित विभागांकडून तात्काळ वर्ग करण्यात यावीत.

३. वैज्ञानिक संशोधन अधिकारी, अनिवार्य चाचणी विभाग या विभागाचे नियंत्रण अधिकारी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक हे राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०४३०१७३६०२३४२७ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUHAS BAJIRAO JADHWAR

Digitally signed by SUHAS BAJIRAO JADHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=0de66b4d57847be117776aeaf9e53c5b70f1b8d7fdab972d3d1e2c6397e1faa5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F66717B05E42A313D9839BD11E491F5C5F850C51D1F3CB32930D359D7331FF36, cn=SUHAS BAJIRAO JADHWAR
Date: 2025.04.30 17:36:59 +05'30'

( सुहास जाधवर )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) अपर मुख्य सचिव ( जलसंपदा ), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री ( वित्त व नियोजन ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (लाक्षेवि / प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) महासंचालक / सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
७) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
८) मा.मंत्री ( जलसंपदा ), गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
९) मा.मंत्री (जलसंपदा), विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) आंतर वित्तीय सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) सह सचिव (आस्था)/ उप सचिव (सेवा)/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
१४) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
१५) सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग.
१६) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) कार्यासन आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ.

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट-अ

महासंचालक, मेरी, नाशिक अंतर्गत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत वैज्ञानिक संशोधन अधिकारी, अनिवार्य चाचणी विभाग, नाशिक या विभागाच्या पदांचा तपशिल

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १. | वैज्ञानिक संशोधन अधिकारी | १ | अधिक्षक अभियंता, मेरी, नाशिक अंतर्गत अस्तित्वातील पद |
| २. | वैज्ञानिक अधिकारी/ शास्त्रीय अधिकारी | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभागाकडून वर्ग |
| ३. | सहाय्यक अभियंता श्रेणी-२/ कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभागाकडून वर्ग |
| ४. | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभागाकडून वर्ग |
| ५. | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभागाकडून वर्ग |
| ६. | संशोधन सहाय्यक | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभागाकडून वर्ग |
| ७. | मदतनीस | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभागाकडून वर्ग |
| ८. | कनिष्ठ लिपिक | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभागाकडून वर्ग |
| ९. | शिपाई | १ | वैज्ञा. संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभागाकडून वर्ग |
| | **एकूण** | ९ (१ वैज्ञा. संशोधन अधिकारी + ८ अन्य अधिकारी/कर्मचारी) | |

SUHAS BAJIRAO JADHWAR

Digitally signed by SUHAS BAJIRAO JADHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT,
2.5.4.20=0de66b4d57847be117776aeaf9e53c5b70f1b8d7fdab972d3d1e2c6397e1faa5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F66717B05E42A313D9839BD11E491F5C5F850C51D1F3CB32930D359D7331FF36, cn=SUHAS BAJIRAO JADHWAR
Date: 2025.04.30 17:37:25 +05'30'

(सुहास जाधवर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner

# परिशिष्ट-ब

महासंचालक, मेरी, नाशिक अंतर्गत अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक अंतर्गत वैज्ञानिक संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभाग, नाशिक व वैज्ञानिक संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभाग, नाशिक या दोन विभागांकडील पदांचा तपशिल.

| अ.क्र. | पदनाम | वैज्ञानिक संशोधन अधिकारी, मृद चाचणी विभाग, नाशिक | वैज्ञानिक संशोधन अधिकारी, सामुग्री चाचणी विभाग, नाशिक |
|---|---|---|---|
| १. | वैज्ञानिक संशोधन अधिकारी | १ | १ |
| २. | उप अभियंता /सहाय्यक संशोधन अधिकारी | १ | १ |
| ३. | वैज्ञानिक अधिकारी/ शास्त्रीय अधिकारी | ४ | ३ |
| ४. | सहाय्यक अभियंता श्रेणी-२/ कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता | ३ | २ |
| ५. | वरिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | ३ | २ |
| ६. | कनिष्ठ वैज्ञानिक सहाय्यक | २ | ३ |
| ७. | संशोधन सहाय्यक | ६ | ५ |
| ८. | निम्नश्रेणी लघुलेखक/ लघुटंकलेखक | १ | १ |
| ९. | वरिष्ठ लिपिक | १ | १ |
| १०. | सहायक भांडारपाल | १ | ० |
| ११. | कनिष्ठ लिपिक | २ | २ |
| १२. | शिपाई | ३ | ४ |
| १३. | हमाल | ० | १ |
| | एकूण | २८ | २६ |

SUHAS BAJIRAO JADHWAR

Digitally signed by SUHAS BAJIRAO JADHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT,
2.5.4.20=0de66b4d57847be117776aeaf9e53c5b70f1b8d7fdab972d3d1e2c6397e1faa5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F66717805E42A313D9839BD11E491F5C5F850C51D1F3CB32930D359D7331FF36, cn=SUHAS BAJIRAO JADHWAR
Date: 2025.04.30 17:37:38 +05'30'

(सुहास जाधवर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner